NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001

YEAR : 26) 1st November 2001 ( No : 9

# विद्यापीठ आणि महाविद्यालयीन अधिव्याख्याता पदासाठी शैक्षणिक अर्हता

नेट/सेटची परीक्षा उत्तीर्ण न झालेल्या राज्यातील विद्यापीठ आणि महाविद्यालयीन अधिव्याख्यात्यांच्या (लेक्चरर) तदर्थ (अॅडव्हॉक) नेमणुका काही अटींवर नियमित करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे.

सप्टेंबर १९९१ ते डिसेंबर १९९९ या कालावधीत अनुदानित/विना अनुदानित महाविद्यालयातून तसेच शासकीय महाविद्यालये/संस्था यामध्ये त्यावेळच्या निवड समितीमार्फत अंदाजे १३ हजार अधिव्याख्यात्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या होत्या. यापैकी सुमारे ७ हजार अधिव्याख्याते अजूनही नेट/सेटची परीक्षा पास न झाल्याने तदर्थ नेमणुकीवर होते. या अधिव्याख्यात्यांच्या नेमणूका खालील अटींवर नियमित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

१. १९ सप्टेंबर १९९१ ते ११ डिसेंबर १९९९ या कालावधीतील नियुक्त्या झालेल्या सर्व (बिगर नेट/सेट) अधिव्याख्यात्यांनी डिसेंबर २००३ सालापर्यंत नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

२. हे अधिव्याख्याते जर २००३ पर्यंत नेट/सेट उत्तीर्ण झाले नाहीत तर त्यांना वार्षिक वेतनवाढीव्यतिरिक्त इतर कोणतेही आर्थिक लाभ (पदोन्नतीचे फायदे) देण्यात येणार नाहीत.

३. या सर्व अधिव्याख्यात्यांना नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत रु. ८,०००-१३,५०० ही अधिव्याख्याता पदाची वेतनश्रेणी देय राहील. जर ते निवृत्त होईपर्यंत नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण झाले नाहीत तर ते अधिव्याख्याता पदासाठी असलेल्या रु. ८०००-१३,५०० या वेतनश्रेणीतच सेवानिवृत्त होतील.

४. शासकीय महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांच्या सेवा या मंत्रिमंडळ स्तरावर निर्णय झाल्यावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सहमतीने नियमित करण्यात येणार आहे.

५. दि. ११ डिसेंबर १९९९ नंतर सेवेत आलेल्या बिगर नेट/सेट अधिव्याख्यात्यांना ह्या सवलती देय असणार नाहीत. तसेच, त्यांच्या सेवा परिवीक्षा कालावधी पूर्ण होण्याच्या आत संपुष्टात आणण्यात येतील.

यापूर्वी, शासनाने दि. २२ डिसेंबर १९९५ रोजी या अधिव्याख्यात्यांच्या सेवा तदर्थ म्हणून समजण्याबाबत काढलेले आदेश रद्द करण्यात येतील.

******

**नेट/सेट बाबतचा घटनाक्रम** : नेटसेट बाबतचा शासननिर्णय अजूनही निर्गमित झालेला नाही. "लोकराज्य"च्या नोव्हेंबर २००१ च्या अंकात पृष्ठ ५० वर प्रसिद्ध झालेला मजकूर मथळ्यासह वर जसाच्या तसा दिलेला आहे. ज्याचा शासननिर्णय अजून निर्गमित झालेला नाही असा मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय असे उपरोक्त मजकूराचे वर्णन करता येईल. - संपादक १९.१०.२००१

******

NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

(B.P.T.A. Regn. No. F-1564 & Soc. Regn. Act. Regn. No. MAH/15 /73 / (NGP)

20 / एस / 2001 : Date 17.08.2001

Dr. E.H.Kathale
Secretary, NUTA, N- 162, Reshimbagh,
Nagpur. Ph. : 741098

प्रति,

**मा. कुलगुरू**, नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**विषय** : ०१.०१.१९९६ पासून लागू करण्यात आलेल्या वेतनश्रेणी प्रमाणे C.A.S. ची अंमलबजावणी करणे.

**संदर्भ** :- १) ०१.०१.१९९६ पासून लागू करण्यात आलेल्या वेतनश्रणीचे संदर्भात महाराष्ट्र शासनाद्वारे दि. ११ डिसेंबर १९९९ रोजी प्रसृत करण्यात आलेला शासकीय आदेश क्रमांक NGC - 1298/(4619)/UNI-4.

२) उपरोक्त विषयाचे संदर्भात नागपूर विद्यापीठाद्वारे दिनांक २८.१२.१९९९ रोजी निर्गमित १९९९ चा डायरेक्शन क्रमांक ७.

महोदय,

पाचव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन प्राध्यापकांना लागू करण्याचे संदर्भातील शासकीय आदेश दि. ११ डिसेंबर १९९९ रोजी प्रसृत करण्यात आला. त्यानुसार नागपूर विद्यापीठ क्षेत्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन प्राध्यापकांना उपरोक्त वेतनश्रेणी मिळण्याच्या दृष्टिकोनातून नागपूर विद्यापीठाने वरील संदर्भात नमूद केल्याप्रमाणे दि. २८.१२.१९९९ रोजी १९९९ चा डायरेक्शन क्रमांक ७ प्रसृत करण्यात आला व त्याप्रमाणे वेतनश्रेणी निश्चितीचे काम पूर्ण करण्यात आले.

वरील उल्लेखित शासकीय आदेशामध्ये आणि आपण दि. २८.१२.१९९९ रोजी प्रसृत केलेल्या १९९९ च्या डायरेक्शन क्रमांक ७ अंतर्गत C.A.S. चा उल्लेख करण्यात आला आहे. ज्या अन्वये व्याख्यात्यांना वरिष्ठ श्रेणीमध्ये निवड / रिडर श्रेणीमध्ये स्थान निश्चितीचे संदर्भातील प्रावधान नमूद करण्यात आले आहे. विद्यापीठ परिनियमाद्वारे या संदर्भातील प्रक्रिया विद्यापीठाला पार पाडायची आहे. नागपूर विद्यापीठाद्वारे याबाबतीत गत एक वर्षापासून कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही हे खेदाने नमूद करावे लागत आहे. त्यामुळे अनेक प्राध्यापकांना पदोन्नत स्थान निश्चिती झाल्यामुळे मिळणाऱ्या लाभांपासून वंचित ठेवण्यात आलेले आहे. वस्तुतः महाविद्यालयांकडून त्यासाठी आवश्यक असणारे प्रस्ताव विद्यापीठाकडे आलेले आहेत.

या निवेदनाद्वारे आपणास विनंती करण्यात येत आहे की, प्राध्यापकांना वरिष्ठ श्रेणीमध्ये, निवड/रिडर श्रेणीमध्ये स्थान निश्चिती प्राप्त होण्यासाठी संबंधित समितीच्या बैठका त्वरित बोलावून ही कार्यवाही पार पाडावी.

आपला नम्र

**(डॉ. एकनाथ कठाळे)**

पत्राची प्रत माहितीसाठी सादर : प्रा.बी.टी.देशमुख, अध्यक्ष, नुटा, सुबोध कॉलनी, अमरावती.

# Nagpur University

## Direction No. 45 of 2001

### Direction Providing procedure for placement of lecturers in senior Grade and Selection Grade

(Issued under Section 14(8) of Maharashtra Universities Act, 1994)

Whereas the Government of Maharashtra vide government resolution No NGC- 1298/(4619)/UNI-4 dated 11th December, 1999 has decided to implement the revised pay scale, as recommended by the University Grants Commission and terms & conditions of service for university and college teachers, And ;

Whereas the Vice-Chancellor in order to implement the revised University Grants Commission pay scale for teachers and other measures for maintenance of standard in higher education, issued Direction No. 7 of 1999 under Section 14 (8) of the Maharashtra Universities Act, 1994. And ;

Whereas in order to give effect to the clarification received vide letter dated 17.4.2000 from the Maharashtra Government, the Vice-Chancellor issued Direction No. 2 of 2000, amending para (A) of Appendix VIII of Direction No. 7 of 1999. And ;

Whereas it is expedient to prepare the procedure for the implementation of career advancement scheme for the teachers of affiliated colleges for their placement in the higher grade as mentioned in Direction No. 7 of 1999,

Now, therefore, I, Dr. Arun Shankar Satputaley, Vice- Chancellor, Nagpur University, in exercise of powers vested under Section 14 (8) of the Maharashtra Universities Act, 1994, do hereby issue the following Direction :-

*Continued on page 112...*

# समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन योजना लागू करणेबाबत मा.उच्च न्यायालयाचा निर्णय

*महाराष्ट्र विधानपरिषद : गुरुवार, २६ जुलै २००१ : दुसरे अधिवेशन २००१*

(१) * १६१११ **सर्वश्री नानासाहेब बोरस्ते, बी.टी.देशमुख, व्ही.यू.डायगव्हाणे, सुरेश पाटील, प.म.पाटील** : तारांकित प्रश्न क्रमांक १२१४० ला दिनांक १३ मार्च २००१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय समाजकल्याण मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय?

(१) समाजकार्य महाविद्यालयातून काम करणाऱ्या "शिक्षक व कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन व्यवस्था लागू करण्यात येणार नाही." हा शासनाचा दिनांक ८ जुलै १९९८ रोजी घेतलेला निर्णय नमूद असलेले संचालक, समाजकल्याण विभाग यांचे दिनांक ३१ मार्च १९९९ चे आदेश रद्दबादल ठरविणारा निर्णय मा.मुंबई उच्च न्यायालयाने रिट पिटीशन नंबर ५४६७ ऑफ १९९९ या प्रकरणात दिनांक १८ जानेवारी २००० रोजी दिला व त्या निवाड्यातच सदर निवृत्तीवेतन योजना टप्याटप्याने लागू करण्यासंबंधी न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय;

(२) असल्यास, उक्त निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी काय उपाययोजना करण्यात आलेली आहे;

(३) उपाययोजना केलेली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.विजयकुमार गावित, श्री.जयवंत आवळे यांच्याकरीता :** (१) होय.

(२) अनुदानित समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना **सेवानिवृत्तीवेतन योजना लागू न करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे.**

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, प्रश्नाला नकारार्थी उत्तर दिलेले आहे. ही योजना लागू न करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे असे म्हटले आहे. खरे म्हणजे आम्ही काही या उत्तरामुळे निषेधही करीत नाही आणि बहिर्गमनही करत नाही. खरे म्हणजे या उत्तरामुळे मा.मंत्रिमहोदयांनीच बहिर्गमन केले पाहिजे असे हे उत्तर आहे. आम्ही प्रश्न असा विचारला होता की, "समाजकार्य महाविद्यालयातून काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन व्यवस्था लागू करण्यात येणार नाही हा शासनाचा दिनांक ८ जुलै १९९८ रोजी घेतलेला निर्णय नमूद असलेले संचालक, समाज कल्याण विभाग यांचे दिनांक ३१ मार्च १९९९ चे आदेश रद्दबादल ठरविणारा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने रिट पिटीशन नंबर ५४६७ ऑफ १९९९ या प्रकरणात दिनांक १८ जानेवारी २००० रोजी दिला आहे व त्या निवाड्यातच सदर निवृत्ती वेतन योजना टप्याटप्याने लागू करण्यासंबंधी न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय?" या प्रश्नाला "होय" असे उत्तर दिलेले आहे.**जो निर्णय रद्दबादल ठरविला तोच निर्णय पुन्हा घेतला आणि हायकोर्टाने हा निर्णय सेट असाईड केला होता.** मी एक ओळ हायकोर्टाच्या निर्णयातील वाचून दाखवितो. "The decision of the State Government to deny benefits of pension-cum-gratuity scheme to teaching and non-teaching staff working in colleges/institutions under Social Welfare Department, taken on 8-7-98 and communicated by the Director, Social Welfare vide it's letter dated 31st March, 99, is set aside." म्हणजे हायकोर्टाने तो निर्णय रद्द ठरविला आणि पुन्हा तुम्ही तो जिवंत करत आहात. याबाबत आम्ही निषेध करत नाही आणि बहिर्गमनही करणार नाही. फक्त तुमची किव करणे एवढेच आमच्या हाती आहे. घटनेच्या कलम १४ विरुध्द तुमचा हा निर्णय आहे. समाजकार्य महाविद्यालयांपैकी एका महाविद्यालयाला म्हणजे मातृसेवा संघाला मिळते आणि दुसऱ्याला मिळत नाही. हे अनकॉन्स्टीट्युशनल आहे म्हणून हायकोर्टाने तुमचा जुना निर्णय रद्दबादल केला आहे. तो निर्णय होऊन एक ते दिड वर्ष झाले आहे. यासंबंधी समाजकल्याण खात्याने विधी व न्याय विभागाचा सल्ला ६/६/२००० ला घेतला. त्यांनी सल्ला काय दिला? तो मी आपणाला वाचून दाखवितो. ते म्हणतात "This department, vide it's UOR dated 19-5-2000, has **already given the opinion that no fruitfull purpose will be served by approaching the Hon.Supreme Court in the aforesaid matter.** Now, the Social Welfare, Cultural and Sports Department has forwarded the opinion of the Assistant Government Pleader who has conducted the aforesaid writ petition before the High Court on behalf of State of Maharashtra, Shri. C.R.Sonawane, Asstt. Govt. pleader vide his letter dated 23-3-2000 has opined that this is not a fit case to file special leave petition against the order dated 18.1.2000 passed by the High Court in W.P. No. 5467 of 1999" म्हणजे तुमचे प्रतिनिधीत्व करणे म्हणजे गुन्हा आहे काय? हायकोर्टासमोर सर्व शक्तीनिशी त्यांनी प्रयत्न केले आणि केस मांडली आणि हायकोर्टाने सांगितले की, **सेट असाईड.** म्हणून माझे म्हणणे असे आहे की, या उत्तरावरुन तुम्हीच बहिर्गमन करा. आम्ही फक्त तुम्हाला एक्सपोज करणारे प्रश्न विचारु शकतो. हायकोर्टाने निर्णय दिला तो सुप्रिम कोर्टाच्या निर्णयाच्या आधारावर आहे. तो निर्णय मी पाहिजे तर वाचून दाखवितो. ते जजमेंटमध्येच म्हटलेले आहे. चूक दुरुस्त करण्याला कधीही उशीर होत नाही. आणि असा उशीर आम्ही होऊ देणार नाही असे काही उत्तर आपण द्याल का? आपण चूक केली ती दुरुस्त कराल काय?

**श्री.विजयकुमार गावित :** मा.सभापती महोदय, मा.सदस्यांनी या ठिकाणी कोर्टाची ऑर्डर वाचून दाखविलेली आहे. त्यामध्ये पुढे असे म्हटलेले आहे की,"The State Government is directed to consider the extension of such benefit to the teaching and non-teaching staff working in the colleges/institutions under Social Welfare Department, in the phased manner." मा.उच्च न्यायालयाने असे आदेश दिलेले आहेत ही गोष्ट जरी खरी असली तरी देखील एकंदरीत राज्याची आर्थिक परिस्थिती पाहता आपल्याला तावडतोब ही योजना लागू करता येणार नाही. ही आर्थिक परिस्थिती सुधारल्यानंतर टप्याटप्याने सेवानिवृत्ती वेतन देण्याच्या बाबत शासन निश्चित विचार करील.

**सभापती :** शासनाने आपल्या लेखी उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, ही योजना लागू न करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतलेला आहे. अशा प्रकारची जी महाविद्यालये शिक्षण खात्याच्या अंतर्गत येतात त्यांना ही योजना लागू आहे पण समाजकल्याण खात्याअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना लागू नाही ही सरळ सरळ डिस्पॅरीटी आहे. वास्तविक पाहता १० वर्षांपूर्वी याची चर्चा याच सभागृहामधून झाली आहे. हे अनुदान कोणी द्यायचे असा प्रश्न उपस्थित झाला होता. सोशल वर्क असा शब्द आल्याबरोबर शिक्षण खाते म्हणाले की, सोशल वेल्फेअर डिपार्टमेंटने अनुदान द्यावे. हा फार लांबलेला प्रश्न आहे. हायकोर्टाने आपला निर्णय दिल्यानंतरही शासन या बाबत असा निर्णय घेणार असेल तर शासन अडचणीमध्ये येईल. हे सर्व लक्षात घेऊन या ठिकाणी शासनाने उत्तर द्यावे.

**श्री.विजयकुमार गावित :** हायकोर्टाने ज्या ऑर्डर दिलेल्या आहेत त्या मध्ये अनुदान टप्प्याटप्प्याने द्यावे असे म्हटलेले आहे. मी या बाबतीत अगोदरच सांगितलेले आहे की, राज्याची आजची आर्थिक परिस्थिती पाहता तावडतोब ही योजना लागू करता येणार नाही. राज्याची आर्थिक परिस्थिती सुधारेल तशी टप्प्याटप्प्याने यांना ही योजना लागू करण्याचा विचार करु.

**श्री.बी.टी.देशमुख :** टप्प्याटप्प्याने यांना सेवानिवृत्ती वेतन देण्याचा निर्णय मंत्री मंडळाने घेतलेला आहे का?

**श्री.विजयकुमार गावित :** अशा प्रकारचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतलेला नाही.

**श्री.बी.टी.देशमुख :** मंत्रिमंडळाने न घेतलेला निर्णय आपण आम्हाला का म्हणून सांगता आहात? एक तर मंत्रिमंडळाने जो निर्णय घेतलेला आहे तो या देशाच्या घटनेविरुध्द आहे. तुम्हाला अनकॉस्टिट्युशनल बिहेविअरची फुल ॲथॉरीटी आहे का? सुप्रीम कोर्टामध्ये यांनी ॲफिडेव्हीट केले. फेज्ड मॅनरमध्ये लागू करण्याचा निर्णय घेतला असेल..

**सभापती :** ते उत्तरामध्ये यायला हरकत नव्हती.

**श्री.बी.टी.देशमुख :** होय ना. आम्ही बहिर्गमन करण्यापूर्वी आपण विचारपूर्वक उत्तर द्या आता आम्हाला, नाहीतर आपल्याला बर्हिगमन करावे लागेल. तसे केले नाहीतर आपल्याला कोठेतरी याचा जाब द्यावाच लागेल. शासनाने लेखी उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, "ही वेतन व्यवस्था लागू करण्यात येणार नाही असा शासनाचा धोरणात्मक निर्णय झालेला आहे." शासनाचे हे उत्तर उद्धटपणाचे, अनकॉस्टिट्यूशनल आणि हायकोर्टाच्या आदेशाचा अवमान करणारे आहे. आता मा.मंत्री महोदय, तोंडी सांगत आहेत की, आम्ही टप्याटप्याने ही योजना लागू करणार आहोत. असा निर्णय मंत्रिमंडळाने घेतलेला आहे का?

**श्री.विजयकुमार गावित :** मंत्रिमंडळाने सध्या हे लागू करायचे नाही असा निर्णय घेतलेला आहे. राज्याची आर्थिक परिस्थिती पाहता सध्या ही योजना

लागू करणे उचित होणार नाही. राज्याची आर्थिक परिस्थिती सुधारल्यानंतर त्यांना टप्प्याटप्प्याने निवृत्ती वेतन देण्याचा विचार करता येईल.

**सभापती :** न्यायालयाने या बाबत एकदा निर्णय दिल्यानंतर आपण असे सांगू शकता का की, आमची आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे आम्ही हा आदेश अमलात आणू शकत नाही. असे असेल तर आपण न्यायालयाला हे कळविणार आहात का?

**श्री.विजयकुमार गावित :** कंटेम्प्ट ऑफ कोर्ट झाले आहे त्यानुसार कोर्टासमोर ॲफिडेव्हीट सादर केले जाणार आहे.

**श्री.प्रकाश जावडेकर :** सभापती महोदय, कोर्टाच्या आदेशानुसार द्यावयाला पाहिजे असे म्हटल्यावर आर्थिक परिस्थिती नाही म्हणून देणे उचित होणार नाही असे माननीय मंत्री महोदय म्हणतात. उचित कसे नाही होणार. तुम्हाला निर्णय मान्य असेल तर शक्य नाही असे म्हणा. उचित होणार नाही असे कसे म्हणता.

**सभापती :** तेवढी दुरुस्ती करा.

**श्री.जयवंत आवळे :** अध्यक्ष महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी

## राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील रेस्ट कॅटॅगरी शिक्षक संवर्गाबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : दुसरे अधिवेशन २००१*

*सोमवार, ३० जुलै २००१*

***१६४८२.सर्वश्री बी.टी.देशमुख, सुरेश पाटील, व्ही.यू.डायगव्हाणे, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते :** सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयीन रेस्ट कॅटॅगरी शिक्षक संवर्गातील काही शिक्षकांना शासन निर्णय क्र.यु.जी.सी.-१२८६ /(११८१) /विशी-४,दि. २७ नोव्हेंबर १९९१ नुसार वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकाप्रमाणे लाभ मिळाला नाही.हे खरे आहे काय;

(२) असल्यास,उपरोक्त शासन निर्णयातील अट क्र.०३ ते ०६ किंवा त्यापैकी एक अट पूर्ण न झाल्यामुळे उपरोक्त रेस्ट कॅटॅगरीतील शिक्षक लाभापासून वंचित आहेत,हे खरे आहे काय ;

(३) असल्यास रेस्ट कॅटॅगरीतील शिक्षक - प्राध्यापकांना वरिष्ठ महाविद्यालयातील नियमित शिक्षक प्राध्यापकांप्रमाणे लाभ देण्यासाठी उपरोक्त शासन निर्णयातील शर्त क्र.०३ ते ०६ क्षमापित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय ;

(४) असल्यास रेस्ट कॅटॅगरीतील शिक्षकांना लाभ मंजूर करण्यासाठी शासनावर किती अतिरीक्त आर्थिक भार पडणार आहे ;

(५) तसेच प्रकरणी शासनाची भूमिका काय आहे;

**श्री. दिलीप वळसे पाटील :** (१) वरिष्ठ महाविद्यालयातील रेस्ट कॅटॅगरीतील जे शिक्षक शासन निर्णय दिनांक २७ नोव्हेंबर १९९१ मधील तरतुदीप्रमाणे अटी पूर्ण करतात त्यांना वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकाप्रमाणे लाभ मिळाला आहे.

(२) परंतु जे शिक्षक दिनांक २७ नोव्हेंबर १९९१च्या शासन निर्णयातील अटी पूर्ण करु शकत नाहीत अशा शिक्षकांना लाभ देता येत नाही.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, दि.२७ जून १९९१ च्या शासन निर्णयाप्रमाणे इतरांच्या प्रमाणे यांच्या बाबतीतही सूचना दिलेल्या आहेत. पण यातील ३,४,५ व ६ या क्रमांकाच्या अटींचे स्वरुप काय आहे ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, या अटींचे स्वरुप पुढीलप्रमाणे आहे :- ३) अशा तऱ्हेने अतिरिक्त ठरल्यामुळे ते त्याच व्यवस्थापनाच्या कनिष्ठ महाविद्यालयात ताबडतोब सामावले गेले असावेत.

४) त्याच व्यवस्थापनाचे वरिष्ठ महाविद्यालयात रुपये ७००-१६०० या वेतनश्रेणीत अधिव्याख्यात्यांची जागा रिकामी झाल्यावर त्यावर त्यांची नेमणूक झाली असावी किंवा जर वरिष्ठ महाविद्यालयात अधिव्याख्यात्यांची जागा रिकामी झाली नसल्यास ते त्याच व्यवस्थापनाच्या कनिष्ठ महाविद्यालयात काम करीत असावेत.

५) व्यवस्थापनाने त्यांना सेवेतून कमी केलेले नसावे.

६) त्यांनी स्वतःहून कधीही राजीनामा दिलेला नसावा.

**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, शेवटच्या दोन अटींच्या विषयी फार वाद नाही. पण क्र.३ व ४ अटींविषयी पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे असे शासनाला वाटत नाही का ?

**श्री.दिलीप वळसे पाटील :** सभापती महोदय, या रेस्ट कॅटॅगरीतील शिक्षकांची संख्या जवळपास १२० होती. यातील बऱ्याचशा शिक्षकांचा प्रश्न मार्गी लागला आहे आणि यापैकी १६ शिक्षकांचा प्रश्न शिल्लक राहीला आहे. या शिक्षकांच्या बाबतीत हा प्रश्न का राहीला याची व्यक्तीगतरित्या तपासणी करुन त्यावर योग्य तो निर्णय राज्य शासन घेईल.

*****

विचारल्याप्रमाणे ही संपूर्ण कागदपत्रे आम्ही कॅबिनेटसमोर आणली होती. कॅबिनेटने याच्यावर सारासार विचार केलेला आहे. आजचा पगाराचा खर्च, अनुदानाच्या सगळ्या रकमा पाहिल्यानंतर ६० टक्क्यांपर्यंत हा खर्च या ठिकाणी गेलेला आहे. म्हणून शासनाने यावर असा निर्णय घेतला आहे की, सध्या तरी अशा प्रकारे निवृत्ती वेतन देणे शक्य नाही. म्हणून त्यांना निवृत्ती वेतन देऊ नये हा निर्णय कॅबिनेटने घेतलेला आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** कॅबिनेटने निर्णय घेतला हे मंत्री महोदयांनी खरे सांगितल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. पण सन्माननीय राज्यमंत्री टप्प्याटप्प्याने देणार असे सांगत आहेत, त्याचा आधार काय?

**सभापती :** हे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** त्यांच्या वैयक्तिक मताला काही महत्व नसते, हे त्यांना कळायला हवे. शासनाचे ते सांगा. मंत्रिमंडळाने असा निर्णय घेतला आहे की, त्यांना निवृत्ती वेतन लागू करावयाचे नाही. हा निर्णय दोन-तीन वर्षापूर्वी घेतला तो हायकोर्टाने सेट असाईड केला. का सेट असाईड केला हे मी सांगतो. यांनी म्हणजे राज्य सरकारने सुप्रिम कोर्टामध्ये ॲफिडेव्हीट केले. त्यासंदर्भात सुप्रिम कोर्टाने जजमेंट दिले आहे त्यात असे म्हटले आहे की,"The apex court, i.e. the Supreme Court, appreciated the stand taken by the Government to extend the policy in a phased manner." म्हणजे तुमच्या पॉलिसीचे सुप्रीम कोर्टाने स्वागत केले आहे. ह्यूज फायनान्शील बर्डन असल्यामुळे आम्ही लागू करु शकणार नाही असे तुमच्या वकिलानी सांगितले. तेथे सांगितल्यानंतर सुप्रिम कोर्टाने असे म्हटले की,"We appreciate the stand that they will implement the scheme in the phased manner." आज हायकोर्टानेसुध्दा सांगितले. सुप्रिम कोर्टामध्ये निर्णय झाला. त्यामुळे हे घटनेच्या १४ व्या कलमाच्या विरुद्ध आहे त्यामुळे तुम्हाला तसे करता येणार नाही, your decision is set aside असा हायकोर्टाचा निर्णय आहे, म्हणून फेर निर्णय घ्या असे सांगितले. यांनी निर्णय काय घेतला? लागू करावयाचे नाही. हायकोर्टाने आणि सुप्रिम कोर्टामध्ये जे ॲफिडेव्हीट तुम्ही केले आणि हायकोर्टाने जो निर्णय दिला या दोन्हीच्या विरोधात जाणारा हा तुमचा निर्णय आहे. ही गोष्ट खरी आहे काय?

**डॉ.विजयकुमार गावित :** सन्माननीय सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, हे कंटेम्प्ट ऑफ कोर्ट झालेले आहे आणि सध्या आम्हाला आर्थिक परिस्थिती बघता ते करता येणार नाही. परंतु ते टप्प्याटप्प्याने पुढे करता येईल. अशा पध्दतीचे ॲफिडेव्हीट आम्ही दिलेले आहे.

**सभापती :** सन्माननीय मंत्री महोदय म्हणतात त्याप्रमाणे हे कंटेम्प्ट ऑफ कोर्टचा विषय झाला असेल आणि हे प्रकरण जर कोर्टामध्ये गेले असेल तर मला असे वाटते की, आता आपण यावर चर्चा करणे योग्य होणार नाही.

**श्री.सुरेश पाटील :** जर कंटेम्प्ट ऑफ कोर्ट असेल आणि हे मॅटर सबज्युडिस असेल तर हे उत्तर दिले कसे?

**सभापती :** उत्तर आपल्याला दिले पाहिजे म्हणून दिले. हे उत्तरसुध्दा माननीय न्यायालयाकडे कोणी सादर करु शकतो.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महोदय, कंटेम्प्ट ऑफ कोर्ट आहे असे आपणही म्हणालात. मंत्रिमंडळाने हा निर्णय कोणत्या तारखेला घेतला आहे?

**श्री.जयवंत आवळे :** अध्यक्ष महोदय, ८ जुलै १९९८ रोजी हे प्रकरण मंत्रीमंडळासमोर ठेवण्यात आले. त्यानंतर दिनांक ११ जुलै २००१ रोजी मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात आले आहे आणि त्यावर सारासार विचार करुन मंत्री मंडळाने हा निर्णय घेतलेला आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** दिनांक ११ जुलै २००१ रोजी जो निर्णय घेतला आहे त्यावर कंटेम्प्ट ऑफ कोर्ट झालेला नाही हे खरे आहे काय?

**डॉ.विजयकुमार गावित :** हा निर्णय लागू केला नाही. त्यांनी कन्सीडर म्हणून आदेश दिलेले लागू केले नाही म्हणून हा कंटेम्प्ट ऑफ कोर्ट केला आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** सुप्रिम कोर्टामध्ये ॲफिडेव्हीट तुम्ही केले त्याचे पालन तुम्ही करत नाही हा विषय कंटेम्प्ट ऑफ कोर्टमध्ये आहे काय?

**डॉ.विजयकुमार गावित :** पूर्वी जो निर्णय घेतलेला होता त्यावर त्यांनी कंटेम्प्ट ऑफ कोर्ट केलेला आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, यातून आता पुरेसे स्पष्ट झालेले आहे आणि त्यामुळे यांच्या निषेधार्ह निर्णयामुळे आम्ही आता प्रश्न विचारून सभागृहाचा वेळ घेत नाही.

*****

**R.S. PATHAK,C.J.:-** Special leave to appeal is granted in both the special leave petitions.

2. The petitioners are teachers employed in various recognised aided private schools in the State of Haryana. The

# AIR 1988 SUPREME COURT 1663

(From : Punjab and Haryana)*

## R.S. PATHAK, C.J.I. AND G.L. OZA, J.

**Civil Appeals Nos. 2366-67 of 1988 (Arising out of Spl. Leave Petn. (Civil) Nos. 11567-68 of 1985) with Writ Petn. Nos. 91-92 and 555-561 of 1986, D/- 28-7-1988.**

**Haryana State Adhyapak Sangh and others, etc. Appellants v. State of Haryana and others, Respondents. with Raj Singh and others etc., Petitioners v. State of Haryana and another, Respondents.**

Constitution of India, Art.136, Art.32, Art.226, Art.14, Art.16, Art.39, Art.41, Art.45 - Education - Teachers of aided private schools - **Pay scales and other emoluments of - Must be in parity with teachers of Government schools** - State Govt. directed to reimburse payment of Addl. D.A. in 35 instalments.

C.W.P. No. 5353 of 1984, D/- 21-2-1985 (Punj and Har), Reversed.

Until 1979, the State of Haryana was following the principle of parity between the teachers in aided private schools and Government Schools in the matter of pay scales and other emoluments as per the recommendations of Kothari Commission. The State met the increased expenditure entirely in regard to Pay and Dearness Allowance. In 1979, the pay scale of teachers in Government schools was revised by the State after the report of the Pay Commission, but in the case of the teachers of aided schools the revision was effected two years later. So the salary and other emoluments paid to the teachers of aided schools fell far behind the emoluments paid to the teachers in Government schools. In various writ petitions and in appeal by the teachers of aided schools before the Supreme Court, the State Government, expressed its readiness to reimburse the payment of ten instalments of the Additional Dearness Allowance, but not the twenty five Additional Dearness Allowance instalments released after 1-4-1981. The grant in aid given by the State Government to these aided schools covered the deficit to the extent of seventy five per cent of the approved expenditure.

**Held, that teachers of the aided schools must be paid the same pay scales and Dearness Allowance as teachers in Government schools** for the entire period claimed by the petitioners, and that the expenditure on that account should be apportioned between the State and the Management in the same proportion in which they share the burden of the existing emoluments of the teachers. Ten instalments representing the State Government's liability shall be paid by the State Government in two equal parts, the first part being payable within three months. The State Government shall also pay the remaining twenty five instalments, the entire amount being payable in five equal parts with effect from 30-9-1989. The State Government was held to be not liable to pay other allowances for the period covered by these 35 instalments, for the periods thereafter, the State Government was directed to take up with the management of the aided schools the question of bringing about parity and evolve a scheme for payment after having regard to the different allowances claimed by the petitioners. C.W.P. No. 5353 of 1984, D/- 21-2-1955 (Punj and Har), Reversed. (Paras 3, 4)

(Note : Benefits of payment of first ten instalments were extended to the teachers who have retired or who have died in service during the pendency of these cases....Ed.) *( @page-SC1664 )*

**Mr. Pankaj Kalra, Mr. B. S. Gupta, Mr. P. C. Kapur and Mr. S. Mitter, Advocates, for Appellants,**
**Mr. Rajinder Sachar, Sr. Advocate, Mr. D. G. Garg, Mr. Mahabir Singhand**
**Mr. A. K. Goel, Advocates with him, for Respondents.**
*** C. W. P. No. 5353 of 1984,D/- 21-2-1985**
**(Punj & Har).**

# JUDGEMENT

schools are maintained under private management. They receive financial aid from the State Government. The petitioners have come to court alleging that teachers employed in Government aided private schools are entitled to parity with the teachers employed in Government schools in the matter of pay scales and other emoluments such as Dearness Allowance, House Rent Allowance, City Compensatory Allowance, Medical Reimbursement and Gratuity, etc. It appears that prior to 1967 there was considerable disparity in the emoluments of teachers employed in the same State, and the Government of India appointed the Kothari Commission to examine the conditions of service of teachers with the object of improving the standards of education in the country. Among other things, **the Kothari Commission recommended that the scales of pay of school teachers belonging to the same category but working under different managements such as Government, local bodies or private organisations should be the same.** Almost all the States, including the State of Haryana, decided to implement the recommendations of the Kothari Commission. The State of Haryana declared in January, 1968 that the revised rates suggested by the Kothari Commission would be made effective from 1 December, 1967, and that the grades of teachers of privately managed schools would be revised on the pattern of the grades of teachers working in Government schools. As the deficit between the original grades and the revised grades was found too burdensome for the managements of the aided schools to bear, the State decided to meet the increased expenditure entirely in regard to pay and Dearness Allowance. **The State Government followed the principle of parity between the teachers working in aided schools and Government schools until 1979.** In 1979, the pay scale of teachers in Government schools was revised by the State after the report of the Pay Commission, but in the case of the teachers of aided schools the revision was effected two years later. The petitioners allege that the salary and other emoluments paid to the teachers of aided schools have fallen far behind the emoluments paid to the teachers in Government schools and this Court should interfere in order to remove such discrimination. We are told that there are about sixty thousand teachers in Government schools while a mere four thousand teachers are employed in aided schools. According to the petitioners, to provide education in schools is the constitutional responsibility of the Government, and this is reflected in the deep and pervasive control exercised by the Government over the running of aided schools. It is pointed out that the control is exercised over almost all areas of management. The Committee of management has to be approved by the State Government, so have the strength of the teaching and the other staff as well as the qualifications and other conditions of eligibility for appointment to the staff. The mode of selection and the determination of seniority are subject to the directions of the State Government and teachers cannot be dismissed, removed or reduced in rank without the prior approval of the State authorities. The tuition fee, as well as freeships, concessions and scholarships are fixed by the State Government, which is also empowered to give instructions in regard to the time table, working hours, pupil ratio, attendance and workload. The financial resources and the heads of income and expenditure are indicated by the State Government.

3. We have heard learned counsel for the parties at considerable length, and we find general agreement between the parties that there is no reason for discrimination between the teachers employed in aided schools and those employed in Government schools so far as the salaries and Additional Dearness Allowance are concerned. The State Government does not accept the claim to *(@page-SC1665)* parity in respect of other heads of allowance put forward by the petitioners. We were at one time disposed to ruling on the question whether the responsibility for providing education in schools belongs to the State Government, and therefore whether there is a corresponding responsibility on the State Government to ensure that in aided schools the teachers are

